# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय :-** विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत **एम.फार्म/एम.ई/.एम.टेक./एम.आर्च /एम.टेक्स्ट.** या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे सिनॉपसिस छाननीसाठी या विभागात सादर करण्याबाबत......

सर्व प्राचार्य/संचालक, पदव्युत्तर अभियांत्रिकी महाविद्यालये/पदव्युत्तर अधिविभाग यांना कळविण्यात येते की, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत **एम.फार्म/एम.ई/.एम.टेक./एम.आर्च/एम.टेक्स्ट.** या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे सिनॉपसिस मान्यतेसाठी वर्षातून दि. **१ जानेवारी ते** दि. **३१ जानेवारी व** दि. **१ ऑगस्ट ते** दि. **३१ ऑगस्ट** असे दोन वेळा पीजीबीयुटीआर विभागामध्ये स्विकारले जातील. सदरचे सिनॉपसिस मान्यतेसाठी अधिष्ठाता (विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा) यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त छाननी समिती समोर सादर करण्यात येतात.

१) कोविड-१९ या साथीच्या रोगामुळे, टाळेबंद कालावधीत याआधीपेक्षा खूपच कमी प्रमाणात सिनॉपसिस या विभागास प्राप्त झाले आहेत.

२) तेव्हा **एम.फार्म/एम.ई/.एम.टेक./एम.आर्च/एम.टेक्स्ट.** या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे सिनॉपसिस प्राचार्य/संचालक यांचेमार्फत संबंधित अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रज्ञान अधिविभाग यांनी दि. **३१ ऑगस्ट, २०२१ पर्यंत सिनॉपसिस या विभागात जमा करण्यात यावेत.**

दि. **३१ ऑगस्ट, २०२१** नंतर जमा होणा-या सिनॉपसिसच्या छाननीसाठी विचार केला जाणार नाही. त्याचप्रमाणे सिनॉपसिस सादर करण्याचा पुढील कालावधी दि. १ जानेवारी ते ३१ जानेवारी असा असेल. तेंव्हा सदरचे सिनॉपसिस वर नमूद केल्याप्रमाणे निर्धारीत वेळेत या विभागास जमा करण्यात यावेत.

आदेशावरून,

कुलसचिव

पीजीबीयुटीआर विभाग/3073
दि. 15 JUL 2021

प्रत :

१. अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक/प्राचार्य, अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

२. इंटरनेट सेल (सर्व संशोधनार्थींच्या माहितीकरीता सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर ठेवण्याकरीता)